मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# धूळ नियंत्रणासाठी महापालिका ॲक्शन मोडवर

## नियमभंग करणारे 4 आर.एम.सी. प्रकल्प सील, धूळ प्रदूषण रोखण्यासाठी प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील वायू प्रदूषण रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडून आरएमसी (रेडी मिक्स काँक्रीट) प्रकल्पांवर विशेष तपासणी मोहीम सातत्याने राबविण्यात येत आहे. पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रकल्पांविरोधात कठोर कारवाई करण्यात येत असून, धूळ प्रदूषण रोखण्यासाठी प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर दिला जात आहे.

महापौर रवि लांडगे यांच्या सूचनेनुसार करण्यात आलेल्या या कारवाई दरम्यान महापालिकेच्या उपद्रव शोध पथकाने पुनावळे, मोशी आणि पिंपळे सौदागर परिसरातील १० आरएमसी प्रकल्पांची पाहणी केली. तपासणीदरम्यान ४ प्रकल्पांमध्ये गंभीर त्रुटी आढळून आल्या. धूळ नियंत्रणासाठी आवश्यक यंत्रणा कार्यरत नसणे, परिसरात स्वच्छतेचा अभाव, तसेच कच्चा माल उघड्यावर साठविण्यात येत असल्याने धूळ प्रदूषण होत असल्याचे निदर्शनास आले.




“प्रदूषण नियंत्रणासाठी केवळ नियम बनविणे पुरेसे नसून त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आरएमसी प्रकल्पांमध्ये आवश्यक प्रदूषण नियंत्रण उपाययोजना न आढळल्यास तात्काळ कारवाई करण्यात येत आहे. पुढील काळातही तपासणी मोहीम अधिक तीव्र करून नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.”
- संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महापालिका.

याअनुषंगाने फरांदे आरएमसी प्रकल्प, मोशी, यश आरएमसी प्रकल्प, चिंचवड, राम ग्रुप क्रिस्टल वन आरएमसी प्रकल्प, मोशी तसेच आसवानी असोसिएट्स जी.के. आरएमसी प्रकल्प, पिंपळे सौदागर या चार प्रकल्पांना तात्काळ लाखबंद (सील) करण्यात आले आहे.

दरम्यान, इतर प्रकल्पांना धूळ नियंत्रणासाठीच्या उपाययोजना तातडीने करण्याचे निर्देश देण्यात आले असून, नियमांचे पालन न केल्यास पुढील टप्प्यात अधिक कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे. शहरातील आरएमसी प्रकल्पांसह बांधकाम आणि औद्योगिक प्रकल्पांवर महापालिकेकडून सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे.

शहरातील धूळ प्रदूषण हे नागरिकांच्या आरोग्यासाठी धोका ठरू शकते आणि याकडे दुर्लक्ष करण्याची महापालिकेकडे अजिबात मुभा नाही. आरएमसीसह सर्व बांधकाम प्रकल्पांनी पर्यावरणीय नियमांचे केवळ पालनच नाही तर जबाबदारीने अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे. नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई ही केवळ औपचारिकता नसून ती सातत्याने आणि कठोरपणे सुरू राहील. नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित वातावरण देणे ही महापालिकेची जबाबदारी असून त्यासाठी कोणतीही तडजोड केली जाणार नाही.
- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

“शहरातील वायू प्रदूषणावर प्रभावी नियंत्रण मिळविणे ही महापालिकेची सर्वोच्च प्राधान्याची बाब आहे. बांधकाम व औद्योगिक प्रकल्पांनी पर्यावरणीय नियमांचे काटेकोर पालन करणे अत्यावश्यक असून, कोणत्याही प्रकारचा नियमभंग सहन केला जाणार नाही. प्रदूषण करणाऱ्या घटकांवर सातत्याने कारवाई करून शहरातील वायू गुणवत्ता सुधारण्यासाठी महापालिका प्रशासन कटिबद्ध आहे.”
- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका..

# वल्लभनगर आगारात एका दिवसात कायापालट; मंत्री सरनाईकांची पाहणी

## अस्वच्छतेवर कारवाईचा परिणाम; प्रवासी थक्क, सुविधांबाबत अधिकाऱ्यांना निर्देश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमधील मुख्य आगार म्हणून वल्लभनगर आगाराची ओळख आहे. अस्वच्छता, दुर्गंधी अन् सुविधांची वानवा असलेल्या आगारात राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष व परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी गुरुवार (दि. 30) वल्लभनगर आगाराला भेट देऊन आगाराची पाहणी केली. मंत्रिमहोदय भेट देणार म्हटल्यानंतर प्रशासनाने एका दिवसात आगार परिसराची केलेली स्वच्छता पाहून प्रवासी थक्क झाले.



राज्यमार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष व परिवहनमंत्री यांनी पिंपरी-चिंचवड आगाराला भेट दिल्यानंतर आगारातील प्रवासी सेवा-सुविधांची पाहणी केली. यावेळी त्यांनी चालक-वाहकांच्या समस्यांविषयी चर्चा केली. प्रवाशांना आहोरात्र सेवा देणाऱ्या चालक-वाहक यांना विश्रांतीगृह स्वच्छ ठेवावेत, तसेच त्यांना अंघोळीसाठी गरम पाण्याची सुविधा द्यावी. कर्मचाऱ्यांसाठी पिण्याचे स्वच्छ, शुद्ध पाण्याची सोय करावी असे विविध निर्देश त्यांनी स्थानकातील अधिकाऱ्यांना यावेळी दिले.

आगारास मंत्रिमहोदयांनी भेट देणार म्हटल्यानंतर आगार परिसर स्वच्छ करण्यात आला होता. तसेच परिसरातील कचराकुंड्या रिकाम्या करण्यात आल्या. पाणपोईच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याचे फलक लावण्यात आले होते.

### वल्लभनगर आगाराचा कायापालट

वल्लभनगर आगाराच्या पाहणीदरम्यान परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी प्रवासी आणि कर्मचाऱ्यांच्या सुविधांवर विशेष भर दिला. चालक-वाहकांसाठी स्वच्छ विश्रांतीगृह, गरम पाण्याची सुविधा आणि शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. मंत्र्यांच्या भेटीपूर्वी आगार परिसरात मोठ्या प्रमाणावर स्वच्छता मोहीम राबविण्यात आल्याने परिसराचा कायापालट झाल्याचे चित्र दिसून आले.

# डिजिटल जनगणनेत सहभागी व्हा, देशाच्या प्रगतीत हातभार लावा..!

## आमदार महेश लांडगे यांचे नागरिकांना आवाहन; पुणे महानगर क्षेत्रामध्ये स्व-जनगणनाबाबत प्रशासनाचीही जनजागृती

**पिंपरी | प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात १६ व्या राष्ट्रीय जनगणनेचा ऐतिहासिक टप्पा सुरू झाला आहे. १ मे २०२६ पासून देशभरात 'स्व-गणनेला' (SELF-ENUMERATION) प्रारंभ झाला असून, पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांनी या पहिल्या डिजिटल जनगणनेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी केले आहे.



आमदार महेश लांडगे यांनी आज स्वतः आपल्या कुटुंबीयांसह ऑनलाइन पद्धतीने स्व-गणना पूर्ण केली. यावेळी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाचे अधिकारी सुरज टिंगरे, किरण गव्हाणे, अरुण गुंडगळ, राहुल शेडगे उपस्थित होते.

या मोहिमेबाबत माहिती देताना आमदार लांडगे म्हणाले की, "ही देशातील पहिली डिजिटल जनगणना असून प्रत्येक नागरिकाचा सहभाग यामध्ये मोलाचा आहे. महाराष्ट्रभरातील जनतेने १ ते १५ मे या कालावधीत SE.CENSUS.GOV.IN या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन आपल्या कुटुंबाची माहिती भरावी आणि आपली जबाबदारी पार पाडावी."

"आपली जनगणना, आपला विकास हा मंत्र समोर ठेवून आपण सर्वांनी जबाबदार नागरिक म्हणून या प्रक्रियेत सहभागी होणे आवश्यक आहे. डिजिटल माध्यमाचा वापर करून आपली माहिती अचूकपणे नोंदवल्यास देशाच्या भविष्यातील नियोजनाला गती मिळेल," असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

### 'आपली जनगणना, आपला विकास'

» "आपली जनगणना, आपला विकास हा मंत्र समोर ठेवून आपण सर्वांनी जबाबदार नागरिक म्हणून या प्रक्रियेत सहभागी होणे आवश्यक आहे. डिजिटल माध्यमाचा वापर करून आपली माहिती अचूकपणे नोंदवल्यास देशाच्या भविष्यातील नियोजनाला गती मिळेल," असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. आमदार लांडगे यांनी स्वतः पुढाकार घेतल्यामुळे शहरात या मोहिमेबाबत जनजागृती निर्माण होत असून, जास्तीत जास्त नागरिकांनी १५ मे पूर्वी आपली नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन प्रशासनाच्या वतीनेही करण्यात आले आहे.

"देशाच्या सर्वांगीण विकासासाठी अचूक माहिती असणे ही काळाची गरज आहे. १६ व्या राष्ट्रीय जनगणनेच्या निमित्ताने प्रथमच आपल्याला 'डिजिटल स्व-गणने'ची संधी मिळाली आहे. मी माझे कर्तव्य पार पाडले आहे, तुम्हीही आजच आपली नोंदणी पूर्ण करा आणि जबाबदार नागरिकत्वाचा परिचय द्या. आपली जनगणना, आपला विकास' हा मंत्र केवळ शब्द नसून ती आपल्या उज्वल भविष्याची पायाभरणी आहे. चला, डिजिटल जनगणनेत सहभागी होऊन सशक्त भारताच्या निर्मितीत आपले योगदान देऊया!

- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे..

# पिंपरी-चिंचवडमध्ये पाणी चोरीवर मोठी कारवाई; 42 नळजोड बंद

## चिखली-मोरेवस्ती भागात अनधिकृत जोडणी उघड; पिंपरी-चिंचवड महापालिकेचा कठोर इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात पाणी चोरीचा नवीन प्रकार उघडकीस आला आहे. एक अधिकृत आणि एक अनधिकृत नळजोड घेऊन अनधिकृत नळजोडाद्वारे पाणी चोरणाऱ्या शहरातील चिखली, मोरेवस्ती भागातील नळजोडधारकांना महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने दणका दिला आहे. असे एकूण 42 अनधिकृत नळजोड खंडीत केले आहेत. पुन्हा अनधिकृत नळजोड घेतल्यास कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे.



### तक्रारींमुळे दोन नळजोडांचा प्रकार उघडकीस

» महापालिकेच्या फ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील चिखली, मोरेवस्ती भागात अर्धा, एक गुंठ्यात बैठी घरे नागरिकांनी बांधली आहेत. या भागात गेल्या काही दिवसांपासून वारंवार अपुरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी होत्या. याची दखल घेत महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने परिसरात पाहणी केली. यामध्ये काही नागरिकांकडे एक अधिकृत आणि एक अनधिकृत नळजोड असल्याचे निदर्शनास आले.

शहरात मागील साडेसहा वर्षांपासून एक दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. 35 टक्के पाणी गळती, चोरी होते. वाढत्या लोकसंख्येनुसार पाणी उपलब्ध होत नसल्याने दिवसाआड पाणीपुरवठा करावा लागत असल्याचे प्रशासनाकडून सांगितले जाते. वाढत्या उन्हामुळे पाण्याची मागणी वाढली असून, अपुरा व कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.

शहरातील विविध भागातून कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी येत आहेत. हौसिंग सोसायटयाना खासगी टँकरचा आधार घ्यावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा विभागाने अनधिकृत नळजोडधारक आणि नळजोडाला थेट मोटार पंप लावून पाणी उपसा करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहे.

अधिकृत नळजोडाचे पाणी मीटर बंद ठेवून अनधिकृत नळजोडामार्फत पाणी चोरी केली जात होती. असे अनधिकृत असलेले 42 नळजोड पाणीपुरवठा विभागाने तोडले आहेत. तसेच यापुढे बेकायदा नळजोड घेतल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता विजयसिंह भोसले यांनी दिला आहे.

महापालिकेच्या फ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील चिखली, मोरेवस्ती भागात अर्धा, एक गुंठ्यात बैठी घरे नागरिकांनी बांधली आहेत. या भागात गेल्या काही दिवसांपासून वारंवार अपुरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी होत्या. याची दखल घेत महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने परिसरात पाहणी केली. एक अधिकृत आणि एक अनधिकृत नळजोड घेऊन अनधिकृत नळजोडाद्वारे पाणी चोरणाऱ्या शहरातील चिखली, मोरेवस्ती भागातील नळजोडधारकांना महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने दणका दिला आहे. असे एकूण 42 अनधिकृत नळजोड खंडीत केले आहेत. पुन्हा अनधिकृत नळजोड घेतल्यास कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे.

### पाणी चोरी खपवून घेणार नाही

» उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाण्याची मागणी वाढली आहे. पाणी चोरी रोखण्यासाठी शहरातील बेकायदा नळजोडण्या शोधून त्यावर तत्काळ कारवाई करण्याचे आदेश पाणीपुरवठा विभागाला दिले आहेत. पाणी चोरी खपवून घेतली जाणार नाही, असे महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिला आहे.

# पुणे महापालिकेच्या 30 कोटींच्या वृक्षगणना निविदेवरून स्थायी समितीत वाद

## वादग्रस्त कंपनीला पुन्हा कंत्राट देण्यास विरोध; सदस्यांचा न्यायालयात जाण्याचा इशारा

**पुणे | प्रतिनिधी**

वृक्षगणनेसाठी सुमारे ३० कोटींच्या निविदेवरून महापालिकेच्या स्थायी समितीत पुन्हा एकदा जोरदार खडाजंगी झाली. यापूर्वी स्थगिती दिलेल्या या निविदेला वर्क ऑर्डर देण्याच्या हालचाली सुरू झाल्याचा मुद्दा समोर आल्यानंतर सदस्यांनी तीव्र विरोध दर्शवित न्यायालयात जाण्याचा इशारा दिला. त्यानंतर प्रशासनाने निविदेवरील स्थगिती कायम ठेवण्याचा निर्णय घेतला. तर निविदेला यापूर्वी स्थगिती दिली असताना वर्क ऑर्डर देण्याच्या हालचाली सुरू असल्याची माहिती मिळाली.

बैठकीत आम्ही त्याला ठाम विरोध केला. प्रशासनाने आता स्थगिती कायम ठेवण्याचे सांगितले असले, तरी परस्पर निर्णय घेतल्यास न्यायालयात दाद मागू, असा इशारा काँग्रेसचे स्थायी समिती सदस्य प्रशांत जगताप यांनी दिला आहे. मिळकत कराच्या जीआयएस मॅपिंगमध्ये गंभीर त्रुटी झाल्यामुळे वादग्रस्त ठरलेल्या मे. सार आयटी रिसोर्सेस या कंपनीलाच सुमारे २९ कोटी ८७ लाखांचे वृक्षगणनेचे कंत्राट देण्यात आले होते.

या कामात झालेल्या चुका लक्षात घेता कंपनीचे १२ कोटी रुपये महापालिकेने जप्त केले आहेत. त्यामुळे या कंपनीला पुन्हा कंत्राट देण्यास सदस्यांनी आक्षेप घेतला होता. प्रशासक राजवटीच्या अखेरीस मंजूर झालेल्या या निविदेला स्थायी समितीने यापूर्वी स्थगिती दिली होती. मात्र, त्यानंतरही वर्क ऑर्डर देण्याचा प्रयत्न झाल्याची चर्चा रंगली.

हा विषय उघडकीस आल्यानंतर गुरुवारी झालेल्या बैठकीत सदस्यांनी आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला जाब विचारला. अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी या संदर्भात सविस्तर प्रेझेंटेशन सादर केले जाईल, असे सांगितले. तसेच, सध्या निविदेवरील स्थगिती कायम ठेवण्यात येत असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

दरम्यान, स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न झाला; मात्र तो होऊ शकला नाही. या प्रकरणात स्थायी समिती अध्यक्ष आणि काही अधिकारी यांच्याकडून निविदा पुढे रेटण्याचा प्रयत्न झाला का, असा सवाल उपस्थित होत आहे.




### वादग्रस्त कंपनीवर सदस्यांचा आक्षेप

**» मिळकतकराच्या जीआयएस मॅपिंगमध्ये गंभीर त्रुटी झाल्यामुळे चर्चेत आलेल्या 'सार आयटी रिसोर्सेस' कंपनीलाच सुमारे २९ कोटी ८७ लाखांचे वृक्षगणनेचे कंत्राट देण्यात आले होते. या कामातील चुका लक्षात घेऊन महापालिकेने कंपनीचे १२ कोटी रुपये जप्त केले होते. त्यामुळे त्याच कंपनीला पुन्हा कंत्राट देण्यास स्थायी समिती सदस्यांनी विरोध दर्शविला. प्रशासक राजवटीच्या अखेरीस मंजूर झालेली ही निविदा यापूर्वीही वादग्रस्त ठरली होती.**

### वृक्षगणना निविदेवरून वाद पेटला

**» पुणे महापालिकेच्या सुमारे ३० कोटी रुपयांच्या वृक्षगणना निविदेवरून स्थायी समितीच्या बैठकीत जोरदार वाद झाला. यापूर्वी स्थगिती दिलेल्या निविदेला पुन्हा वर्क ऑर्डर देण्याच्या हालचाली सुरू असल्याचा मुद्दा समोर आल्यानंतर सदस्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. प्रशासनाने अखेर निविदेवरील स्थगिती कायम ठेवण्याचा निर्णय घेतला. या विषयावर सदस्यांनी प्रशासनाला जाब विचारत पारदर्शकतेची मागणी केली.**

### न्यायालयात जाण्याचा इशारा

**» काँग्रेसचे स्थायी समिती सदस्य प्रशांत जगताप यांनी या प्रकरणात परस्पर निर्णय घेतल्यास न्यायालयात जाण्याचा इशारा दिला आहे. अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी या विषयावर सविस्तर सादरीकरण केले जाईल, असे स्पष्ट केले. दरम्यान, स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. निविदा पुढे रेटण्यासाठी काही स्तरावर प्रयत्न झाले का, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.**

# मुंबई-पुणे 'मिसिंग लिंक' प्रकल्पावर आता एआयची नजर

## स्काडा, एएनपीआर आणि स्मार्ट कॅमेऱ्यांमुळे अपघात, कोंडी व नियमभंगावर तातडीने नियंत्रण शक्य


**पुणे | प्रतिनिधी**

मुंबई आणि पुण्यादरम्यानचा 'मिसिंग लिंक' प्रकल्प अभियांत्रिकी उत्कृष्टतेचे प्रतीक ठरला आहे. याचवेळी तो अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे अनोखे उदाहरण ठरत आहे. या प्रकल्पावर कृत्रिम प्रज्ञा (एआय) तंत्रज्ञानाधारित यंत्रणांची नजर आहे. त्यात स्काडा प्रणालीसह एआय आधारित देखरेख व नियंत्रण यंत्रणा, बुलेट कॅमेरे, पीटीझेड कॅमेऱ्यांसह एएनपीआर यंत्रणांचा समावेश आहे. यामुळे वाहनांचा अपघात, कोंडी, नियमभंग या गोष्टी तातडीने निदर्शनास येऊन त्यावर लगेच उपाययोजना शक्य होणार आहेत.

अनेक वर्षांपासून सह्याद्रीच्या पर्वतरांगांमधून होणारा मुंबई-पुणे प्रवास निसर्गरम्य असला तरी वेळखाऊ आणि अनिश्चित होता. महाराष्ट्र शासनाने १३.३ किलोमीटर 'मिसिंग लिंक' जोडण्याची संकल्पना मांडली. हा प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि नवयुगा इंजिनिअरिंग कंपनीने प्रत्यक्षात आणला.

खंडाळा घाटातील वाहतूक कोंडी टाळून हा मार्ग प्रवासाचा वेळ सुमारे ३० मिनिटांनी कमी करतो. यामुळे महाराष्ट्रातील महत्त्वाच्या मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील कोंडी सुटणार आहे. या प्रकल्पात विविध प्रकारच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. हा १३.३ किलोमीटर लांबीचा प्रकल्प असून त्यातील १०.६७ किलोमीटर भाग पाच मार्गिकांच्या दुहेरी बोगद्यांचा आहे. या बोगद्याची रुंदी प्रत्येकी २२.३३ मीटर आहे.

सुपरवायझरी कंट्रोल अँड डेटा अक्विजिशन सिस्टीम (स्काडा) : या यंत्रणेमुळे प्रत्यक्षात मिसिंग लिंकमधून सुरू असलेल्या वाहतुकीवर २४ तास नजर ठेवण्यात येणार आहे. याचबरोबर या प्रकल्पातील हवेची गुणवत्ता आणि बोगद्यातील अत्याधुनिक यंत्रणांच्या कार्यावर देखरेख ठेवण्यात येईल. एआय आधारित मॉनिटरिंग अँड कंट्रोल सिस्टीम्स या यंत्रणेमुळे बोगद्यातील वाहतुकीची विदा संकलित केली जाणार आहे. बोगद्यातील वाहतुकीच्या नियोजनाबाबत योग्य पद्धतीने निर्णय घेतले जाणार आहेत.



### विश्वविक्रमी प्रकल्प

**» मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचा भाग म्हणून जगातील सर्वात रुंद भूमिगत बोगदा तयार करून नवयुगाने कारकिर्दीतला दुसरा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड पटकावला आहे. नवयुगा इंजिनिअरिंग कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक चिंत श्रीधर म्हणाले की, हा केवळ जागतिक विक्रम नाही, तर भारत काय साध्य करू शकतो याचे द्योतक आहे. सह्याद्रीतील कठीण बेसॉल्ट खडकांमध्ये सर्वात रुंद भूमिगत बोगदा उभारणे ही आमच्या जागतिक दर्जाच्या पायाभूत प्रकल्पांची अंमलबजावणी करण्याच्या क्षमतेची साक्ष आहे. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डकडून मिळालेली ही पावती आणि मान्यता आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे.**

# बारावी निकालात पुणे जिल्हा अव्वल; विभागाचा निकाल 91.25%

## विज्ञान शाखेची आघाडी कायम; मुलींचा उत्तीर्णतेत मुलांवर पुन्हा मात

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या बारावीच्या लेखी परीक्षेच्या निकालात पुणे जिल्ह्याने यंदाही बाजी मारली. पुणे जिल्ह्याचा सर्वाधिक 93.32 टक्के निकाल लागला. यानंतर अहिल्यानगर जिल्ह्याचा 90.32 टक्के, तर सोलापूर जिल्ह्याचा 87.22 टक्के निकाल लागला. पुणे विभागातील तिन्ही जिल्ह्यांचा एकत्रित निकाल 91.25 टक्के लागला. मागील वर्षीच्या तुलनेत पुणे विभागाच्या निकालात यंदा 0.62 टक्क्यांची घट झाल्याचे स्पष्ट झाले आहे. पुणे विभागीय मंडळाचे अध्यक्ष औदुंबर उकिरडे, सचिव डॉ. मीनाक्षी राऊत यांनी निकालाबाबतची माहिती दिली.



पुणे विभागातून 2 लाख 44,191 नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. प्रत्यक्ष परीक्षा दिलेल्या 2 लाख 41,826 विद्यार्थ्यांपैकी 2 लाख 20,680 विद्यार्थी उत्तीर्ण झाले. गेल्या वर्षी पुणे विभागाचा निकाल 91.88 टक्के लागला होता. यंदा राज्याचाच एकूण निकाल घटल्यामुळे विभागाच्या निकालातही 0.62 टक्क्यांनी घट झाली आहे. परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या 7,644 पुनर्परीक्षार्थ्यांपैकी 7,471 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यापैकी 5,779 विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्याची टक्केवारी 77.35 आहे.

जिल्हानिहाय निकालाचा आढावा घेतला असता पुणे जिल्ह्यातून 1 लाख 30,899 विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यात 67,304 मुले, 63,595 मुली होत्या. 66,761 मुले, 63,180 मुली अशा एकूण 1 लाख 21,941 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. उत्तीर्ण झालेल्या 1 लाख 21 हजार 263 विद्यार्थ्यांमध्ये 60 हजार 837 मुले, 60,426 मुलींचा समावेश आहे. मुलांच्या तुलनेत मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण 4.52 टक्के जास्त आहे. जिल्ह्यातील विज्ञान शाखेचे 98.14 टक्के, कला शाखेचे 83.37 टक्के, वाणिज्य शाखेचे 89.02 टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

जिल्हानिहाय निकालाचा आढावा घेतला असता पुणे जिल्ह्यातून 1 लाख 30,899 विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यात 67,304 मुले, 63,595 मुली होत्या. 66,761 मुले, 63,180 मुली अशा एकूण 1 लाख 21,941 विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. उत्तीर्ण झालेल्या 1 लाख 21 हजार 263 विद्यार्थ्यांमध्ये 60 हजार 837 मुले, 60,426 मुलींचा समावेश आहे. मुलांच्या तुलनेत मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण 4.52 टक्के जास्त आहे. जिल्ह्यातील विज्ञान शाखेचे 98.14 टक्के, कला शाखेचे 83.37 टक्के, वाणिज्य शाखेचे 89.02 टक्के विद्यार्थी उत्ती र्ण झाले.

अहिल्यानगर जिल्ह्यातून 32,263 मुले, 27,302 मुली अशा एकूण 59,565 विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. 31,924 मुले, 26,971 मुली अशा एकूण 58,895 विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली. त्यापैकी 52,196 विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यात 27,694 मुले, 25,502 मुली असे एकूण 53 हजार 196 विद्यार्थी उत्तीर्ण झाले. मुलांच्या तुलनेत मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण 8.71 टक्क्यांनी जास्त आहे. जिल्ह्यातील विज्ञान शाखेचे 96.55 टक्के, कला शाखेचे 75.59 टक्के, वाणिज्य शाखेचे 85.26 टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

सोलापूर जिल्ह्यातून 29,595 मुले, 24,132 मुली अशा एकूण 53,727 विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. परीक्षा दिलेल्या 52,990 विद्यार्थ्यांपैकी 29,165 मुले, 23,825 मुली होत्या. तर उत्तीर्ण झालेल्या 46 हजार 221 विद्यार्थ्यांमध्ये 23,978 मुले, 22,243 मुलींचा समावेश आहे. तर मुलांच्या तुलनेत मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण 11.14 टक्क्यांनी जास्त असल्याचे दिसून येते. जिल्ह्यातील विज्ञान शाखेचे 95.52 टक्के, कला शाखेचे 72.85 टक्के, वाणिज्य शाखेचे 83.66 टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याची माहिती पुणे विभागीय मंडळाने दिली.

### विभागातील गुणवंत

**» विभागातील 981 विद्यार्थ्यांनी 90 टक्क्यांहून अधिक गुण मिळविले आहेत. 85 ते 90 टक्के गुण मिळविलेले 3 हजार 186, 80 ते 85 टक्के गुण मिळविलेले 6 हजार 679, 75 ते 80 टक्के गुण मिळविलेले 10 हजार 899 विद्यार्थी आहेत.**

### विज्ञान शाखेचा सर्वाधिक निकाल

**» शाखानिहाय निकालात विज्ञान शाखेचा सर्वाधिक 98.14 टक्के इतका निकाल लागला आहे. वाणिज्य शाखेचा एकूण निकाल 89.02 टक्के इतका, तर कला शाखेचा एकूण निकाल 83.37 टक्के लागला आहे. त्यामुळे निकालात विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारल्याचे स्पष्ट झाले आहे.**

# नवले पूल परिसरात संतापाचा उद्रेक! रुग्णवाहिका आडवी लावून ‘रास्ता रोको’

## नसरापूर प्रकरणाचे पडसाद पुण्यात; आरोपीला फाशीच्या मागणीसाठी सिंहगड रस्ता परिसरातील नागरिक आक्रमक.

**पुणे | प्रतिनिधी**

नसरापूर प्रकरणातील बालिका सिंहगड रस्ता परिसरात राहणारी आहे. यामुळे नागरिक, कार्यकर्ते आणि नातेवाईकांनी सायंकाळी नवले पुल परिसरात मोठे आंदोलन केले. आरोपीला शिक्षा करण्याची तसेच मुख्यमंत्र्यांनी येऊन आश्वासन देण्याची आंदोलकांनी मागणी केली. यामुळे परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी झाली. हे आंदोलन सायंकाळी पाचच्या सुमारास सुरु झाले. ते रात्री साडे आठपर्यंत सुरुच होते.



घटनास्थळी मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते दाखल झाल्याने पोलिसांचा मोठा फौजफाटा दाखल झाला होता. मृतदेह घेऊन जाणारी रुग्णवाहिका नातेवाईकांनी रस्त्यात आडवी लावली. नागरिकांच्या तीव्र भावना लक्षात घेऊन पोलिसांनी सामंजस्याची भुमिका घेतली होती. मात्र अंत्यसंस्कार वेळेत होणे आवश्यक होते. यासाठी पोलीस नातेवाईक आणि आंदोलकांना विनवणी करत होते.

यासाठी घटनास्थळी सह पोलीस आयुक्त रंजन कुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे , उपायुक्त संभाजी कदम सिंहगड नऱ्हे व इतर पोलीस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. बालिकेचा मृतदेह अंत्यसंस्कारासाठी वैकुंठ स्मशानभूमीत आणण्यात येणार होता. मात्र आंदोलनामुळे मृतदेह वैकुंठला आणण्यास दोन ते अडीच तास उशीर झाला. पोलिसांनी आंदोलकांना पांगवत वाहतूक सुरळीत केली. दरम्यान वैकुंठ स्मशानभूमीतही मोठ्या प्रमाणावर बंदोबस्त ठेवला होता.

पोलीस उपायुक्त (वाहतूक) हिंम्मत जाधव यांनी रस्ता रोको आंदोलन विचारात घेता नागरिकांना पर्यायी मार्गाचा अवलंब करण्याचे आवाहन केले होते. आंदोलनामुळे साताऱ्याकडून मुंबईकडे जाणाऱ्या दोन्ही मार्गिका पुर्णपणे बंद केल्याचे सांगितले. यामुळे वडगाव पुलाकडे येण्याचे टाळून सुरक्षित ठिकाणी थांबून रहावे, तसेच पर्यायी मार्गाचा अवलंब करावा असे आवाहन त्यांनी केले.

### वाहनांच्या रांगावाढली

**» कार्यालये सुटण्याच्या वेळेसच रास्ता रोको करण्यात आला होता. यामुळे पुणे -मुंबई महामार्गावर दोन्ही बाजूने वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. नागरिकांना तासन तास वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागले. पुलावरही मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. पोलिसांनी कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी अतिरिक्त कर्मचारी तैनात केले होते. राजकीय पक्षाचा कोणताही बडा नेता रात्री उशीरापर्यंत घटनास्थळी दाखल झाला नव्हता.**